जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोलीच्या www.gadchiroli.nic.in या संकेत स्थळावर, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली व गडचिरोली जिल्हयातील सर्व उपविभाग (महसूल) आणि तहसिल कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रसिध्दीसाठी जाहीरात.

महाराष्ट्र शासन

महसूल विभाग

## जिल्हाधिकारी,गडचिरोली यांचे आस्थापनेवरील लघुटंकलेखक (अस्थाई) खुल्या प्रवर्गातील रिक्त पद भरती बाबत जाहीरात.

क्र.कार्या-२/आस्थापना-१/लघुटंकलेखक/भरती/सीआर-१७०/२०११,
दिनांक १७.१२.२०११.

जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे आस्थापनेवरील लघुटंकलेखक (अस्थाई) (गट-क) संवर्गातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पद खालील अटिंच्या अधीन राहून खुल्या स्पर्धेमधून भरावयाचे आहे. त्यासाठी पात्र उमेदवारांनी त्यांची शैक्षणीक अर्हता (गुणपत्रीका प्रत्येक विषयात उत्तीर्ण झाल्याबाबत जोडाव्यात), जात वैधता प्रमाणपत्र/जात प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, जन्मतारखेचा दाखला, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन इत्यादी प्रमाणपत्रासह विहीत नमुन्यातील अर्ज दिनांक ३१-१२-२०११ पर्यंत कार्यालयीन वेळात पोस्टाद्वारे मागविण्यांत येत आहेत. अर्ज कार्यालयात परस्पर स्विकारले जाणार नाहीत. दिलेल्या मुदतीनंतर (दिनांक ३१-१२-२०११ नंतर) प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा घेण्यांत येईल,

**भरावयाच्या रिक्त पदांचा तपशिल**

| अ. क्र | पदाचे नांव | वेतन श्रेणी | प्रवर्ग | एकूण पद संख्या | समांतर आरक्षण | | | | | | | समांतर आरक्षण व्यतिरिक्त (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | महिला | अपंग | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | अंशकालीन पदविधर | |
| १. | लघुटंक लेखक | ५२००-२०२०० ग्रेड वेतन रु. २४०० | खुला | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | | | एकुण | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |

टिप - *वरील पद अस्थाई स्वरुपाचे असून, याबाबत कोणासही दावा सादर करता येणार नाही.

### पात्रतेच्या अटी ( महत्वाच्या सुचना )

**शैक्षणीक अर्हता :-**

१) **लघुटंकलेखक संवर्गाकरीता:-** शैक्षणिक अर्हता अर्ज करतेवेळी किमान माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (एस.एस.सी.) उमेदवारांनी धारण केलेली असणे आवश्यक आहे.

**व्यवसायीक अर्हता :-**

१) **लघुटंकलेखक संवर्गाकरीता:-** टंकलेखनाची मराठी किमान ३० श.प्र.मि. व इंग्रजी ४० श.प्र.मि. शासन मान्य परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. लघुलेखन मराठी ८० श.प्र.मि. व इंग्रजी ८० श.प्र.मि. शासन मान्य परिक्षा उत्तिर्ण असणे आवश्यक आहे. तसेच संगणक अर्हता प्राप्त प्रमाणपत्र (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या C.C.C. किंवा O स्तर किंवा A किंवा B किंवा C स्तर यापैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र किंवा (ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र प्राधान्यशिल.

वयोमर्यादा:- (दिनांक ३१-१२-२०११ रोजीची गणली जाईल)

१ उमेदवाराचे वय किमान १८ वर्षे, कमाल ३३ वर्षे व मागासवर्गीयांसाठी ३८ वर्षे यापेक्षा जास्त नसेल. तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे राहिल.

२ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम आहे. खालील समांतर आरक्षणातील व या जाहिरातीतील मसुद्यात नमूद प्रवर्गातील उमेदवार अर्ज करु शकतात.

(एक) प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त उमेदवारांकरिता ४५ वर्षापर्यंत.

(दोन) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू ३८ वर्षे (सर्वसाधारण) व ४३ वर्षे (मागासवर्गीय) पेक्षा जास्त नसावे.

(तीन) स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी व सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी उमेदवारांना ४५ वर्षे.

(चार) अपंग उमेदवाराकरिता ४५ वर्षे

(पाच) माजी सैनिक उमेदवाराच्या सशस्त्र दलातील सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील.

(सहा) पदवीधर/पदविकाधारक अंशकालिन उमेदवारांकरिता ४६ वर्षे.

अटी व शर्ती :-

१) उमेदवारांने लघुटंकलेखक या पदासाठी अर्ज सादर करतांना, अर्जावर व पॉकीटावर <u>लघुटंकलेखक पदासाठी अर्ज</u> असे नमूद करावे. छाननीअंती ज्या उमेदवारांचे अर्ज नाकारण्यात आले नाहीत. अशा उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी तात्पुरता प्रवेश दिला जाईल.

२) उमेदवाराने ओळखपत्रातील छायाचित्राच्या आकाराचे त्यांचे अलीकडच्या काळातील छायाचित्र पासपोर्ट (फोटो ) आवेदन पत्रावर विहित जागी घट्ट चिकटवावे. फोटो खाली योग्य ठिकाणी स्वाक्षरी करावी.

३) <u>परीक्षेचे स्वरुप:-</u>

१) लघुटंकलेखक पदाकरीता:- १. कमीत कमी अर्हता माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण (एस.एस.सी.) आहे. अशा पदाकरिता परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयांवरील प्रश्नाकरिता प्रत्येकी २५ गुण ठेवून एकूण १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाची असेल. सदर परीक्षा इंग्रजी विषय वगळता अन्य विषयांची परीक्षा मराठी भाषेतून घेण्यात येईल.

२. लेखी परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची व्यावसायीक चाचणी (श्रृतलेखन मराठी व इंग्रजी) ८० गुणाची घेण्यात येईल.

३. प्रत्यक्ष मुलाखत २० गुणाची घेण्यात येईल.

४. लघुटंकलेखक पदाकरिता शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दिनांक २७/०६/२००८ मधील मुद्या ५ नुसार, जे उमेदवार लेखी परीक्षेत किमान ४५ टक्के गुण प्राप्त करतील अशा उमेदवारानांच व्यावसायीक चाचणी देता येईल. तसेच गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. उमेदवाराची निवड लेखी परीक्षा, व्यावसायीक चाचणी व मुलाखतीत प्राप्त केलेल्या एकत्रित गुणांच्या आधारे निवड यादी तयार करुन निवड यादीतील उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

४) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र.प्रानिमं २०१०/२०९/प्र.क्र.६६/१०/१३-अ,दिनांक १९ जून, २०१० अन्वये उमेदवारांनी उत्तरे लिहिण्यासाठी अथवा चिन्हांकित करण्यासाठी फक्त काळ्या शाईच्या बॉलपेनचा वापर करावयाचा आहे. अन्य कोणत्याही साधनाचा वापर केल्यास संबंधित उत्तरपत्रिका तपासली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

५) उमेदवारांना परिक्षेस येण्या जाण्याचा प्रवासखर्च दिला जाणार नाही .

६) अनुसूचीत जाती, अनुसूचित जमाती वगळून, विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, क, ड व इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग आणि महिला आरक्षणाचा लाभ घेणा-या महिला यांना क्रिमीलेअर तत्व लागू करण्यात आल्याने, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे अद्यावत असलेले वैध (Valid) नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

७) कोणत्याही कारणास्तव पदे कमी झाल्यास किंवा रिक्त पदाच्या संख्येत बदल झाल्यास निवड केलेल्या उमेदवारास नियुक्तीबाबत हक्क प्रस्थापित करता येणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना पदस्थापना जिल्हयात कुठेही देण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारानी पदस्थापनेबाबत/ स्थळाबाबत कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा पदस्थापनेबाबत विनंती केल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल.

८) उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवाशी असावा (अधिवास प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक).

९) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

१०) सदर पदांसाठी विहित केलेल्या नमुन्यातील अर्ज करावे लागेल.

११) अपंगाचे आरक्षण शासन निर्णयानुसार राहील.

१२) परीक्षेचा निकाल तयार करताना परीक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता क्रम शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-२००७/प्र.क्र. ४६/०७/१३-अ, दिनांक २७ जून, २००८ मधील मुद्दा क्रमांक ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे खालील निकषांवर क्रमवार लावला जाईल.

१ अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार, त्यानंतर

२ मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत प्रथम अनुसूचित जमाती मधील नंतर अनुसूचित जाती, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती, भटक्या जमाती, जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जमाती ), भटक्या जमाती (धनगर व तत्सम), इतर मागासवर्ग या क्रमाने, त्यानंतर

३ शारिरीक दृष्टया अपंग असलेले उमेदवार, त्यानंतर

४ माजी सैनिक असलेले उमेदवार, त्यानंतर

५ स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य असलेले उमेदवार, त्यानंतर

६ वय (वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारांचा क्रम वरती लागेल.)

वरील प्रत्येक संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यांत येईल.

१३) परिक्षेचा प्रकार, पदाची संख्या, समांतर आरक्षणात बदल करणे, परिक्षेला स्थगीत करणे व रद्य करणे, अंशतः बदल करणे, भरती रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार प्रशासनाने राखून ठेवलेले आहे. याबाबत कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

१४) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती व कागदपत्रे अपूर्ण सादर केल्यास /अगर खोटी कागदपत्रे सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी, नियुक्ती प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा नियुक्ती झाल्यानंतरसुध्दा उमेदवारी/ नियुक्ती रद्य करण्यांत येईल.

१५) या जाहिरातील नमूद केलेल्या पदावर उमेदवारांची निवड न्यायालयीन निर्णय, शासनाच्या विविध विभागाचे शासन निर्णय व परिपत्रके यातील निर्देशाच्या अधिन असेल.

१६) उमेदवार ज्या राखीव जाती प्रवर्गाच्या पदासाठी अर्ज करित असेल त्या जाती प्रवर्गाचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध असल्यास अर्जासोबत जोडावे. उमेदवाराची अंतिम निवड झाल्यानंतर, नियुक्ती जात पडताळणी समितीचे वैधता प्रमाणपत्र तपासणीचे अधिन राहील.

१७)लेखी परिक्षेत पात्र ठरुन निवड झालेल्या उमेदवाराची यादी परिक्षा झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली येथील नोटीस नोटीस बोर्डवर तसेच www.Gadchiroli.nic.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत येईल. तसेच भरती प्रक्रीये संबधी वेळोवेळी देण्यात येणा-या सुधारीत व अद्यावत सुचना कार्यालयीन सुचना फलकावर/ सांकेतीक स्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल. याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. **त्यामुळे उमेदवारांनी निवड प्रक्रिया पुर्ण होईपर्यत सदर वेबसाईटवरील सुचनांचे वेळोवेळी न चुकता अवलोकन करावे.**

१८)माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन पदवीधर, सेवायोजन कार्यालयाकडून नोंदणीकृत झालेले उमेदवार व इतर संबधीत कार्यालयात नोंदणीकृत असलेल्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नांव रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे, सेवायोजन कार्यालयाकडे/ एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय/ जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय/ प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त नोंदणी कार्यालय येथे नोंदविले असेल तरी त्यांनी वरील पदासाठी स्वतंत्रपणे अर्ज सादर करणे बंधनकारक राहील.

१९)शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांच्या कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने अर्ज भरावा व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी. परवानगीशिवाय सादर केलेल्या अर्जाच्या आधारे निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती दिली जाणार नाही. व तसे आढळल्यास त्यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यांत येईल.

२०)महिलांच्या आरक्षणाबाबत शासन निर्णय महिला व बाल कल्याण विभाग क्रमांक/८२/ २००१/मसेआ/प्र.क्र.४१५/का-२, दि. २५ मे, २००१ मधील तरतुदीनुसार अधिन राहील.

२१)सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रं.एसआरव्ही-२०००/१७/२०००/१२ दिनांक १.७.२००५ नुसार लहान कुटूंब असल्याचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे. ( अविवाहित उमेदवारांनीसुध्दा लागू नाही असे नमूद करुन सदर प्रतिज्ञापन स्वाक्षरी करुन सादर करणे आवश्यक आहे.)

२२)वरील पदाकरिता पात्र/अपात्र उमेदवारांची यादी त्यांचे अर्जाचे छाननीनंतर कार्यालयाचे नोटीस बोर्डावर लावण्यात येईल. अपात्र ठरलेल्या उमेदवारांचे बाबतीत स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**भरती बाबत इतर आवश्यक सूचना :-**

१) सोबत दिलेल्या नमुन्यात ए-४ (३०X२९ से.मी.) आकाराच्या पांढ-या जाड कागदावर एकाच बाजुला हस्तलिखीत/टंकलिखीत व चक्रमुद्रीत करुन अर्ज करावा. उमेदवारांनी अर्जातील माहितीचा तपशिल सुस्पष्टपणे नमुद करावा. उमेदवाराने ओळखपत्रातील छायाचित्राच्या आकाराचे त्यांचे अलिकडच्या काळातील छायाचित्र आवेदन पत्रावर विहीत जागी घट्ट चिकटवावे. फोटो खाली योग्य ठिकाणी स्वाक्षरी करावी. शाळा सोडल्याचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र व इतर संपूर्ण आवश्यक प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती जोडून विहीत नमुन्यामध्ये माहिती भरुन आवेदनपत्रे पुढील पत्यावर विहीत केलेल्या अंतीम तारखेपर्यंत किंवा तत्पूर्वी पोहचतील अशा बेताने पाठवावीत. विहीत तारीख व वेळानंतर मिळालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. प्रत्येक उमेदवाराने अर्ज हे डाक नोंद पोच देय ( Registered Acknowledgment) डाकेने, स्पीड पोस्टव्दारे, साध्या डाकेने पाठवावेत.

२) **परिक्षा शुल्क :-**

१.

| अ.क्र. | पदाचे नांव | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | लघुटंकलेखक | रु.२००/- | रु.१००/- |

२. **माजी सैनिकांना परिक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.** त्यांनी माजी सैनिक असल्याबाबत सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र अर्जासह जोडणे आवश्यक आहे. इतर उमेदवार खाली नमूद पध्दतीने शुल्क अदा करु शकतील. सदर परिक्षा शुल्क हे ना-परतावा राहील. कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही.

अ) सदरचे परिक्षा शुल्क डी.डी. (Demand Draft) स्वरुपात **अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी गडचिरोली** यांचे नावांने राष्ट्रीयकृत बँकेचा (Nationalised Bank) गडचिरोली येथे देय असलेला **(Payable at Gadchiroli )** असणे आवश्यक राहील. परिपूर्ण अर्जासोबत परिक्षा शुल्क डी.डी.स्वरुपात जोडण्यात यावा. डी.डी. चे मागील बाजूस उमेदवारांनी पदाचे नांव, स्वत:चे नांव व पत्ता नमूद करावा. **किंवा,**

ब) उमेदवारांना परीक्षा शुल्क भारतीय स्टेट बँकेच्या कुठल्याही शाखेत रोख स्वरुपात जमा करता येईल. त्यासाठी खाली नमूद केलेले प्रपत्र (Format) तयार करुन दोन प्रतीमध्ये भरुन बँकेत सादर करावीत व रक्कम प्राप्त झाल्याबाबत प्राधिकृत अधिका-याची स्वाक्षरी झालेली प्रपत्राची एक प्रत बँकेकडून प्राप्त करुन अर्जासोबत जोडावी.

| CASH ONLY<br>भारतीय स्टेट बँक<br>**State Bank Of India**<br>जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली<br>**Collector Office, Gadchiroli**<br>जिल्हा निवड समिती, गडचिरोली अंतर्गत लघुटंकलेखक पदभरती, 2011<br>**Application Fee Details**<br>**Cash can be tentered at any branch of State bank of India** | |
|---|---|
| Name of Post | |
| Deposit Date | / /2011. |
| Acc No. | **31944973953** |
| | |
| Applicant's Name | |
| Application Fee Rs. | |
| Transaction ID<br>(Bank Journal No.) (Only Numeric) | |
| **Branch Stamp** | **Authorized Signatory** |

**NOTE**

**1) Candidate to ensure the registration ID/ Ref. No. is correctly entered by Bank.**

३) <u>अर्ज सादर करण्याचा व पत्र व्यवहाराचा पत्ता :- अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी</u> **<u>गडचिरोली, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली - पिन कोड - ४४२६०५.</u>**

४) अर्जदाराने अर्जासोबत प्रमाणपत्राच्या साक्षांकित छायांकित प्रती जोडाव्यात. इयत्ता दहावीची गुणपत्रीका तसेच उच्च शैक्षणिक अर्हतेच्या प्रती जोडणे अनिवार्य आहे. ( उदा. शैक्षणीक पात्रता, उच्च शैक्षणिक पात्रता, गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, जातीचे प्रमाणपत्र, जात पडताळणी समितीचे जात वैधता प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, जन्म प्रमाणपत्र इत्यादी ) मुळ प्रती जोडू नयेत.

५) निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

७) निवड होऊन नियुक्ती मिळालेल्या उमेदवारांना नियमानुसार प्रशिक्षण, विभागीय परीक्षा, विहीत केलेल्या भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

८) आरक्षीत पदांकरीता उमेदवारांनी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे वैधता प्रमाणपत्र शासनाचे प्रचलित नियमानुसार नियुक्तीपूर्वी सादर करणे बंधनकारक राहील.

९) निवड केलेल्या उमेदवारांची गडचिरोली जिल्हयात ग्रामीण व दुर्गम क्षेत्रात कोठेही नियुक्ती होऊ शकते. तसेच महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही-२००९/प्र.क्र.२५३/०९/१२, दिनांक ०२.०२.२०११ अन्वये, सबंधित कर्मचारी गडचिरोली जिल्हयाच्या बाहेर बदलीस पात्र ठरणार नाहीत.

१०) आवेदनपत्र स्विकृत/अस्विकृत करण्याचे अधिकार, निवड प्रक्रियेत वेळेवर होणारे बदल करण्याचे, तसेच त्याबाबत अंतीम निर्णय घेण्याबाबतचे संपूर्ण अधिकार जिल्हा निवड समिती/ नियुक्ती प्राधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.

११) <u>उमेदवारांनी आवेदन पत्रासोबत सादर केलेल्या दस्तऐवज/ प्रमाणपत्रांचाच पात्रतेच्या दृष्टीने विचार करण्यात येईल.</u> त्यामुळे उमेदवाराने अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, <u>सर्व उच्च शैक्षणिक अर्हता</u>, अनुभव व इतर सर्व आवश्यक दस्तऐवजाच्या/ प्रमाणपत्राच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रति परिपुर्ण भरलेल्या अर्जासोबत न चुकता जोडून अर्ज सादर करावेत. एकदा अर्ज सादर केल्यानंतर त्यामध्ये दुरुस्ती करण्यास, स्वाक्षरी करण्यास वा <u>प्रमाणपत्र/</u>

<u>दस्तऐवज नव्याने जोडण्यास</u> भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर, कोणत्याही परिस्थितीत मुभा (संधी) असणार नाही. या बाबीची नोंद घ्यावी.

१२) परिपुर्ण भरलेले व सर्व आवश्यक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रति जोडलेले अर्ज जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्या कार्यालयात सादर करण्याचा शेवटचा दिनांक ३१-१२-२०११ आहे. सदर दिनांकानंतर प्राप्त झालेले अर्ज, विहीत वय व पात्रता धारण न करणा-या उमेदवारांचे अर्ज, विहीत नमुण्यात नसलेले अर्ज, मजकुर अपूर्ण व चुकीचे भरलेले अर्ज, आवश्यक त्या ठिकाणी स्वाक्षरी नसलेले अर्ज, आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या सांक्षाकित प्रती जोडले नसेलेले अर्ज, अधिवास प्रमाणपत्र व लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन नसलेले अर्ज, मागासवर्गीयाच्या बाबतीत जातीचे प्रमाणपत्र नसलेले अर्ज, वैध मुदतीचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र नसलेले अर्ज, विहीत शुल्क न भरलेले व फोटो नसलेले अर्ज, अपूर्ण अर्ज तसेच अन्य उणिवा असलेले अर्ज नाकारण्यात येतील/ विचारात घेतले जाणार नाहीत.

१३) पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा दिनांक ०८.०१.२०१२ रोजी घेण्यात येईल. यासाठी पात्र उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी प्रवेशपत्र दि.०७.०१.२०१२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय कडून कार्यालयात कार्यालयीन वेळेत परस्पर देण्यात येतील. त्याचप्रमाणे कार्यालयाची वेबसाईट <u>www.gadchiroli.nic.in</u> यावर सुध्दा उपलब्ध करुन देण्यात येतील. उमेदवारांनी त्यावरुन प्रवेशपत्र परस्पर डाउनलोड करुन प्राप्त करुन घ्यावेत. उमेदवारांना लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाहीत, याची कृपया उमेदवारांनी नोंद घ्यावी.

अध्यक्ष,
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हाधिकारी, गडचिरोली.

# <u>अर्जाचा नमूना</u>

अर्जाचा कार्यालयीन क्र. --------

प्रति,

मा. अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा

जिल्हाधिकारी, गडचिरोली.

## लघुटंकलेखक या पदासाठी अर्ज.

जाहिरातीचा क्रमांक व दिनांक :-

| | | | |
|---|---|---|---|
| १ | उमेदवाराचे पुर्ण नांव (आडनाव प्रथम) | मराठीत | पासपोर्ट आकाराचा अलीकडे काढलेला फोटो येथे चिकटवावा व स्वत:ची स्वाक्षरी करावी. |
| | | इंग्रजीत | |
| २ | पत्र व्यवहाराचा संपुर्ण पत्ता | | |
| | | पिन कोड क्रमांक | |
| | | दुरध्वनी/ मोबाईल क्रमांक:- | |
| ३ | जातीचा प्रवर्ग/वर्गवारी (खालील चौकोनात √ अशी खुण करावी.) | | |

| अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | मागासवर्गीय असल्यास जात/जमात (पोटजातीसह):- ---------------------------------------- | | | | | | |
| ५ | उमेदवार पुरुष आहे किंवा स्त्री ? | पुरुष | | स्त्री | | | |
| ६ | उमेदवार नॉनक्रिमीलेयर आहे काय ? | होय | | नाही | | | |
| ७ | जन्म तारीख (अंकात व अक्षरात):- | | | | | | |
| ८ | दि.०१/१२/२०११ रोजी वय:- | वर्ष | | महिने | | दिवस | |
| ९ | जन्म ठिकाण:- | गांव:- | | तालुका:- | | जिल्हा:- | |
| १० | वैवाहीक स्थिती:- | विवाहित | | अविवाहित | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | अ) उमेदवार प्रकल्पग्रस्त आहे काय? | होय | | नाही | |
| | ब) उमदवार भुकंपग्रस्त आहे काय? | होय | | नाही | |
| | क) उमेदवार माजी सैनिक आहे काय? | होय | | नाही | |
| | क) उमेदवार अपंग आहे काय? | होय | | नाही | |
| | ड) उमेदवार राष्ट्रीय/ राज्यस्तरीय खेळाडू आहे काय? | होय | | नाही | |
| | इ) उमेदवार अंशकालीन पदवीधर/पदविकाधारक आहे काय? | होय | | नाही | |
| | ई) उमेदवार स्वातंत्र्य सैनिकांचा पाल्य/सन १९९१ चे जनगणना कर्मचारी/१९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी आहे काय? | होय | | नाही | |
| | फ) महिला आरक्षणाअंतर्गत अर्ज केला आहे काय? | होय | | नाही | |
| | (अ ते फ चे समर्थनार्थ आवश्यक प्रमाणपत्र जोडावे.) | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | राष्ट्रीयकृत बँकेचे नांव | डी. डी. क्रमांक/ पावती (Transaction ID) क्रमांक | दिनांक | रक्कम |
| | | | | |

१३ शैक्षणिक अर्हता.

| अ.क्र. | परिक्षेचे नांव | विभागीय मंडळ/संस्थेचे/ विद्यापिठाचे नांव | विषय | परिक्षेत मिळालेले गुण | एकुण गुण | टक्केवारी | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | इयत्ता ४ थी | | | | | | |
| २ | एस.एस.सी. (१०वी) | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | एच.एस.सी. (१२वी) | | | | | | |
| ४ | पदवी | | | | | | |
| ५ | पदव्युत्तर पदवी | | | | | | |
| ६ | संगणक प्रमाणपत्र | | | | | | |
| ७ | मराठी टंकलेखन | | | | | | |
| ८ | इंग्रजी टंकलेखन | | | | | | |
| ९ | मराठी लघुलेखन | | | | | | |
| १० | इंग्रजी लघुलेखन | | | | | | |
| ११ | इतर | | | | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | अतिरिक्त अर्हता. | | |
| | अ | | |
| | ब | | |
| १५ | सेवायोजन कार्यालय/समाज कल्याण/आदिवासी प्रकल्प अधिकारी/जिल्हा सैनिक मंडळाकडे नांव नोंदणी केली आहे काय? | | |
| | असल्यास नोंदणी ठिकाण:- | नोंदणी क्रमांक/वर्ष:- | वैधतेची तारीख:- |

## प्रतिज्ञापत्र

मी असे प्रमाणित करतो/करते की, आपले विभागातील लघुटंकलेखक यांची पदे भरण्या बाबतची जाहीरात काळजीपुर्वक वाचली असून सदर जाहीरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच वरील अर्जात दिलेली माहिती खरी असून त्याचे पृष्ठयर्थ प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती सोबत जोडलेल्या आहेत. वर नमूद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास माझी सदर पदाकरीता उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल व मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील याची मला जाणीव आहे. याबाबत नियुक्ती अधिका-यांचा निर्णय मला बंधनकारक राहील व याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

स्थळ:-

दिनांक:-

उमेदवाराची स्वाक्षरी

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम-२००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमूना-अ**

## प्रतिज्ञापन

(नियम-४ पहा)

मी, श्री./श्रीमती/कु. -----------------------श्री. ------------------------- यांचा/याची मुलगा/मुलगी/पत्नी, वय ---- वर्षे, राहणार ---------------- याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१) मी, ----------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ------ (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या -------- आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमूद करावे)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलांमूळे सदर पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल. याची मला जाणीव आहे.

स्थळ:-

दिनांक:-

उमेदवाराची स्वाक्षरी

( अविवाहीत उमेदवारांनी सुध्दा नमुना अ प्रतिज्ञापत्र लागू नाही असे नमूद करुन स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.)

Approved

Collector, Gadchiroli